नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०३/२०२६ (रविवार)

---

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ,एसबीएल एनर्जी लिमिटेड राउळगाव या कंपनीत झालेल्या स्फोटाबाबत....

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक ०१/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे माहीती प्राप्त झाली की, दिनांक ०१/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:०० ते ०७:०० वाजेच्या सुमारास मौजा **राउळगाव येथील** खाणकाम व औदयोगिक कामासाठी स्फोटके निर्माण करणारी **एसबीएल एनर्जी लिमिटेड, या कंपनीत** स्फोट झाला आहे. अशी माहीती प्राप्त होताच कळमेश्वर पोलीस तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी फायरबिग्रेड, ॲम्बुलन्स, बी.डी.डी.एस पथक बोलाविण्यात आले. सदर घटनास्थळी पोलीस पथक आणि National Disaster Response Force ( NDRF ) आणि State Disaster Response Force (SDRF) पथक यांनी हजर होवुन बचाव कार्य तात्काळ सुरू केले.

मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, मा. डॉ. विपिन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपूर, मा.श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण आणि इतर वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवुन बचाव कार्याला गती दिली. सदर घटनेत १८ जणांचा मृत्यु झाला असुन २४ जण जखमी आहे. जखमींना तात्काळ उपचाराकामी ऑरेंज सिटी हॉस्पीटल, ए स्क्वेअर हॉस्पीटल आणि मेडीकल कॉलेज नागपुर येथे दाखल करण्यात आले मृतदेहांचा मरणोत्तर पंचनामा आणि उत्तरीय तपासणी करिता मेडीकल कॉलेज नागपुर येथे पाठविण्यात आले आहे

घटनास्थळी Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी, Petroleum and Explosive Safety Organisation (PESO) चे अधिकारी , Regional Forensic Science labortory (RFSL) चे पथक यांनी घटनास्थळी भेट देवुन पाहणी केली. बि.डी.डी.एस पथक नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा संपुर्ण घटनास्थळाची पाहणी केली आहे.

सदर घटनास्थळी मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा ,मा. ना. ॲड. आशीष जयस्वाल (राज्यमंत्री), ,मा. श्री. श्यामकुमार बर्वे (लोकसभा सदस्य, रामटेक), तसेच मा. श्री. चरणसिंग ठाकुर ( विधान सभा सदस्य ) यांनी घटनस्थळाची पाहणी करून आढावा घेतला तसेच पिडीतांच्या नातेवाईकांची भेट घेवुन चर्चा केली तसेच योग्य आर्थिक मदत मिळवुन देण्याचे आश्वासन दिले.

**सदर प्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली असुन Directorate of Industrial Safety and Health (DISH) आणि Petroleum and Explosive Safety Organisation (PESO) चे आधिकारी यांनी कंपनीकडुन नियम व शर्तीचे पालन न केल्याबाबतचा प्रथामिक तपासणी अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कंपनीवर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

## घरफोडीचे ०३ गुन्हे उघड, १ आरोपी अटक,
## ०७ लाख ४१ हजार ३६३ रूपयाचा मुद्देमाल जप्त ,
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक २३/०२/२०२६ रोजी फिर्यादी सारंग धनराज लांजेवार, वय ४२ वर्ष, रा. ढोमणे ले आउट, सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तक्रार दिली की, दिनांक २२/०२/२०२६ रोजी ११.०० वा. फिर्यादी हा परिवारासह लग्नाकरीता आपले घराचे दार बंद करून घराला लॉक लावुन कळमेश्वर येथे गेले असता फिर्यादीचे वडील दुपारी ०४.३० वा. घरी आले असता त्यांनी फिर्यादीला फोन करून सांगतले कि, घराचे कुलुप तुटलेले आहे फिर्यादी लगेच घरी परत आला घरातील सामान अस्तव्यस्त पडलेले होते. अलमारीच्या

लॉकरमध्ये ठेवलेली एक कापडी बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने एकुण किंमती १,६५,९४१/—रूपये व लाकडी ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले नगदी १०,०००/— रूपये असा एकुण १,७५,९४१/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. २१२/२०२६ कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे. सावनेर पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान दिनांक २८/०२/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यात अभिलेखावरील घरफोडया करणारा सराईत गुन्हेगार नामे खुशाल पंढरी बारापात्रे, वय ३८ वर्ष, रा. प्रभाग क्र. ५, बुट्टीबोरी जि. नागपूर हा असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. आरोपीचा शोध घेऊन त्यास बुट्टीबोरी येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्याने पोलीस स्टेशन कळमेश्वर, सावनेर परिसरात घरफोडया केल्याचे कबुल केले. पोलीसांनी पंचासमक्ष विविध गुन्हयात चोरीस गेलेले सोन्या चांदीचे दागिने किंमती ७,२८,३६३/— रूपये, नगदी १३०००/—रूपये असा एकुण ७,४१,३६३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.

१) पो स्टे सावनेर गुन्हे रजि.नं.२१२/२०२६ कलम ३३१(३),३०५(अ) भा.न्या.स

२) पो स्टे कळमेश्वर गुन्हे रजि.नं. १११/२०२६ कलम३३१(३), ३०५(अ) भा.न्या.स

३) पो स्टे पारशिवनी गुन्हे रजि.नं. १४८/२०२६ कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या.स

असे एकुण ०३ घरफोडीचे गुन्हे उघड झाले आहे.




## नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध दारू बाबत ३४ गुन्हे नोंद एकुण २ लाख ४ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल जप्त

आगामी सणोत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अवैध दारू बाबत विशेष मोहीम राबवुन **दिनांक** २८/०२/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयांतील सर्व पोलीस स्टेशनननी अवैध दारू बाबत कारवाई करून गुन्हे दाखल केले आहे. सदर कारवाईत अवैध दारूबाबत महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये **३४ गुन्हे नोंद करण्यात आले** आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे महिला आरोपी हिचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे भास्कर सदाशिव धोटे, वय २७ वर्ष, रा. केळवद याचे वर १

गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे राधेश्याम हिरालाल उपरेड, वय ३९ वर्ष, रा. कोथूळणा, ता. सावनेर २) पूरूषोत्तम बापूराव धार्मिक, वय ६१ वर्ष, रा. लांबटपूरा खापा, ता. सावनेर, जि. नागपूर ३) प्रल्हाद नागोजी परतेकी, वय २४ वर्ष, रा. सोनपूर, ता. सावनेर, जि. नागपूर ४) महिला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे नामदेव शेषराव पुनटकार, वय ५५ वर्ष, रा. झेंडा चौक, पहलेपार सावनेर याचेवर गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी क्र. १) नामे निकेश नरेंद्र भोसले, वय अंदाजे ३० वर्ष, रा. पारधी बेडा, चांपा जि. नागपुर २) ०२ महिला आरोपी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे क्र. १) नामे रामु दयाराम उके, वय ५० वर्ष, रा. तुडका, ता. कुही २) ताराचंद पाटिल उके, वय ४५ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी क्र. १) कमलेश क्रिष्णा मडावी, वय २७ वर्षे, रा. टांगला, ता. रामटेक, जि. नागपुर २) ०३ महिला आरोपी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे सचिन दामु धुर्वे, रा. काचुरवाही, त. रामटेक याचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी क्र. १) नामे नागसेन गुरूदेव चव्हाण, वय ४७ वर्ष, रा.तामसवाडी, ता. पारशिवनी, जि. नागपुर २) महादेव चिरकुट उपासे, वय ५५ वर्ष, रा. करंभाड, ता. पारशिवनी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** आरोपी क्र. १) नामे गणेश गुलाबराव नेहारे, वय ४२ वर्ष, रा. पानउबाळी, ता. कळमेश्वर २) राहुल मारोतराव बसले, वय ४२ वर्ष, रा. चंद्रनगर लोणी, ता. वरूड, जि. अमरावती याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद **पोलीस स्टेशन नरखेड** आरोपी क्र. १) नामे शुभम सुरेश रेवतकर, वय २९ वर्ष, रा. सावरगाव, तह. नरखेड २) रविन्द्र केशव रेवतकर वय २५ वर्ष रा. सावरगाव तह. नरखेड ३) अतुल सुरेश रेवतकर वय २८ वर्ष रा. सावरगाव तह. नरखेड ४) बाबुलाल भादु धुर्वे वय ७४ वर्ष रा. मसोरा तह. नरखेड ५) उदयसिंग माणिकराव कवडती वय ४० वर्ष रा. गोवारगोंदी तह नरखेड ६) शुभम मनोहर हिवसे वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. २ नरखेड ७) शुभम रमेश मस्के वय २६ वर्ष रा. गणेशपुर तह. वरूड जि अमरावती ८) नरेन्द्र पंजाबराव आठवले वय ३४ वर्ष रा खैरगाव तह. नरखेड याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०८ गुन्हे नोंद **पोलीस स्टेशन काटोल** आरोपी नामे मनोज सुधाकर कांबळे, वय ३६ वर्ष, रा. कुकडी

पांजरा, ता. काटोल याचे वर प्रत्येकी एक गुन्हा **पोलीस स्टेशन बेला** आरोपी क्र. १) नामे दिनेश धनराज चावरे, वय ३६ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपूर २) गजानन देवराव येरचे, वय ५४ वर्षे, रा. कवडापुर, ता. उमरेड, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** आरोपी क्र. १) नामे सागर मदनलाल जावरकर, वय २७ वर्ष, रा. जुनी ग्रम पंचायत, टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३४ गुन्हे दाखल केले आहे.

**सदर कारवाईत १५०३० मि.ली. देशी दारू , ३९६ लिटर मोहाफुल दारू, ३६०० लिटर मोहाफुल सडवा , इतर साहीत्यासह असा एकुण २०४७८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## नगुपर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार बाबत ३० आरोपींवर कारवाई
## १४ गुन्हे नोंद
## एकुण २३ हजार ९३८ रूपयांचा मुद्देमाल जप्त

आगामी सणोत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अवैध जुगाराबाबत विशेष मोहीम राबवुन **दिनांक** २८/०२/२०२६ **दिनांक** २८/०२/२०२६ **रोजी अवैधरित्या** सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळणाऱ्या/खेळवणाऱ्या **आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र जुगार कायदया** अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच जुगार खेळणाऱ्या/खेळवणाऱ्या **एकूण** १४ गुन्हे दाखल केले असुन सदर कारवाईत ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व नगदी, मोबाईल **असा एकुण २३,९३८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी क्र. नामे १)सलीम ईकबाल कुरेशी, वय ३८ वर्ष, रा. गोंडखैरी, ता. कळमेश्वर, २) रमेश लक्ष्मण काळपांडे, वय ५० वर्ष, रा. हिंगणा नागपूर याचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे रविन्द्र शंकरराव कळंबे, वय ४५ वर्ष, रा. पिपळगाव (राउत), ता. नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी क्र. १) नामे वीरेंद्र रामदास लंगडे, वय ३३ वर्ष, रा.

कचारीसावंगा कोंढाळी, ता. काटोल २) विभीषन रतीराम बाजनघाटे, वय ४३ वर्ष, रा. आडेगाव, ता. हिंगणा याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे राजेंद्र श्रावण कौरती, वय ५२ वर्ष, रा. मेटपांजरा २) योगेश विनायकराव सुपुटकर, वय ३९ वर्ष, रा. येनवा, ता. काटोल याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद,

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे रमेश संपत मांढरे, वय ५२ वर्ष, रा. चापेगडी, त. कुही, जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे भिष्माचार्य शंकर हुमने, वय ५४ वर्ष, रा. वेलतुर, ता. कुही याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे ज्ञानेश्वर उर्फ नाना तानोबाजी मांढरे, वय ३९ वर्ष, रा. सालई, ता. उमरेड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे महादेव भिवाजी मोहनकर, वय ५२ वर्ष, रा. भिवापुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) नामे १) अवि मन्साराम मोहरले, वय ३२ वर्षे, रा. वाठोडा सोनेगाव २) शाम जिहारी आत्राम, वय ४४ वर्षे, रु. भिसी, ता. चिमूर जि. चंद्रपूर, ह.मु. सातगाव, कन्हाळगाव ३) राहुल गौतम वाघमारे, ४२ वर्षे, वार्ड क्रमांक ०४, दुधाळा सातगाव ४) कैलास बबन ढेंगरे, वय ४७ वर्ष, रा. जयपूर सातगाव ५) सुरेश विज्ञान फुलजेले, वय ४५ वर्षे, वार्ड क्रमांक ३ बोरगाव सातगाव याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) नामे कुनाल गोविंदा हिवसे, वय २२ वर्ष, रा. तेलंगखेडी, त. पारशिवनी २) अनिल अशोक ढोके, वय ३० वर्ष, रा. निमखेडा पारशिवनी ३) अमन बालचंद सोनेकर, वय २५ वर्ष, रा. निमखेडा ४) तुकाराम कवडु बंड, वय ५६ वर्ष, रा. बोरडा ५) सुरज सुभाकर गिरी, वय २६ वर्ष, रा.केरडी ६) संदिप रामजी ठवरे, वय ४२ वर्ष, रा. टेकेपार, त.भंडारा ७) चंद्रशेखर महादेव घुगल, वय ४५ वर्ष, रा. काचुरवाही ८) रामु नत्थुजी बागडे, वय ४५ वर्ष, रा. खेडी त. पारशिवनी याचे वर १ गुन्हा नोंद पोलीस स्टेशन **पारशिवनी** येथे आरोपी क्र. १) नामे १) किशोर दादाराव ईनवाते, वय ३४ वर्ष, रा. नरहर, त. पारशिवनी २) अजय फजितराव मडावी, वय २३ वर्ष, रा. बनेरा, त. पारशिवनी ३) सूरेश सावजी भलावी, वय ४४ वर्ष, रा. नरहर, त. पारशिवनी जि. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद तसेच ४) उमेश चौतराम शेन्डे, वय ४२ वर्ष ५) प्रभाकर पांडुरंग भुजाडे, वय ५० वर्ष, ६) विक्की इंद्रजीत बिच्छोरे, वय ३२ वर्ष, तिन्ही रा. माहुली

ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद, महाराष्ट्र जुगार कायदयान्वये **१४ गुन्हे नोंद करण्यात आले** आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने